14 AUG 2017

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शहीद स्फूर्ती केंद्र परिवर्तन घडवेल : सिंघल

## विद्यापीठाचा उपक्रम; कोल्हापूर, सातारा, सांगलीतील शहिदांच्या कुटुंबीयांची उपस्थिती

लोकमत न्यूज नेटवर्क

सातारा : 'शिवाजी' विद्यापीठाने सामाजिक बांधीलकी जपत साताऱ्यात सुरु केलेल्या शहीद स्फूर्ती केंद्रातून देशप्रेम, राष्ट्रीय एकात्मता, आदरभाव, आदी मूल्ये ही चांगल्याप्रकारे विद्यार्थ्यांमध्ये व समाजात रुजतील. हे केंद्र समाजपरिवर्तन घडवेल,' असे प्रतिपादन जिल्हाधिकारी श्वेता सिंघल यांनी केले.

येथील जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या यशवंतराव चव्हाण सभागृहात शिवाजी विद्यापीठ संचलित शहीद स्फूर्ती केंद्राच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे प्र. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. यावेळी स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन डॉ. अनिल पाटील, शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर, राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक डी. के. गायकवाड, शहीद स्फूर्ती केंद्राचे समन्वयक प्राचार्य डॉ. आर. व्ही. शेजवळ, सहसमन्वयक कॅप्टन डॉ. महेश गायकवाड, कर्नल देवेन भारद्वाज, मेजर भानुदास जरे, कर्नल प्रकाश नरहरी, कॅप्टन उदाजीराव निकम, ग्रुप कॅप्टन वळवाडकर यांची प्रमुख उपस्थिती होती.




शहीद स्फूर्ती केंद्राचे उद्घाटन करताना जिल्हाधिकारी श्वेता सिंघल, डॉ. डी. टी. शिर्के, प्राचार्य अभयकुमार साळुंखे, डॉ. अनिल पाटील, प्राचार्य डॉ. आर. व्ही. शेजवळ, आदी मान्यवर उपस्थित होते.

शहीद स्फूर्ती केंद्रांचे उद्घाटन समारंभानिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या वतीने सांगली, सातारा, कोल्हापूर जिल्ह्यांतील शहीद कुटुंबीयांचा प्रमुख मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र, स्मृतिचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

'स्फूर्ती केंद्रासाठी व आजी-माजी सैनिकांसाठी, त्यांच्या कुटुंबीयांसाठी जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत सर्व प्रकारचे सहकार्य करु,' असे आश्वासन श्वेता सिंघल यांनी यावेळी दिले. शिवाजी विद्यापीठाचे प्र. कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, प्राचार्य अभयकुमार साळुंखे, डॉ. अनिल पाटील, शहीद स्फूर्ती केंद्राचे समन्वयक प्राचार्य डॉ. राजेंद्र शेजवळ यांच्यासह मान्यवरांची यावेळी भाषणे झाली.

14 AUG 2017
तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'ग्रॅहॅमच्या रिपोर्ट'चे आज ग्रंथरूपाने प्रकाशन

## शिवाजी विद्यापीठात होणार सोहळा; कोल्हापुरातील २०० वर्षांपूर्वीचे लोकजीवन येणार पटलावर

प्रतिनिधी
कोल्हापूर

कोल्हापूरमधील तत्कालीन पोलिटिकल सुप्रिटेंडंट मेजर डी. सी. ग्रॅहॅमचा रिपोर्ट आद्य ग्रंथाच्या माध्यमातून सोमवार, १४ रोजी प्रकाशित होणार आहे. 'स्टॅटिस्टीकल रिपोर्ट ऑन द प्रिन्सीपॅलिटी ऑफ कोल्हापूर' असे ग्रंथाचे नाव आहे.

शिवाजी विद्यापीठातील शाहू सिनेट सभागृहात सकाळी ११ वाजता श्रीमंत शाहू छत्रपती महाराज आणि अर्थ व कृषितज्ज्ञ डॉ. यशवंतराव थोरात यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रकाशन सोहळा होणार आहे. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे अध्यक्षस्थानी असतील.



१८५४ मध्ये ईस्ट इंडिया कंपनीच्या आदेशावरून कोल्हापूरमधील पोलिटिकल सुप्रिटेंडंट मेजर डी. सी. ग्रॅहॅम यांनी सातत्याने सात वर्षे श्रम घेऊन संकलित केलेला हा साधन ग्रंथ आहे. यामध्ये २०० वर्षांपूर्वीचे कोल्हापूरचे लोकजीवन, उद्योगधंदे, कृषिजीवन, कला, साहित्य यांची अतिशय बारकाईने माहिती दिली देण्यात आली आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील मराठी, कन्नड आणि पार्शी भाषांतील सुमारे ३० शिलालेखांची माहिती यामध्ये समाविष्ट आहे. इंग्रज सरकार व कोल्हापूरकर छत्रपती यांच्यातील करार तसेच पत्रव्यवहार या ग्रंथात देण्यात आला आहे.

या ग्रंथातून २०० वर्षांपूर्वीचे कोल्हापूर, राजर्षी शाहूपूर्व काळ याची माहिती मिळणार असून, हा एकमेव दस्तऐवज आहे. गेली १०० वर्षे हा ग्रंथ उपलब्ध नव्हता. ठिकठिकाणाहून त्याच्या प्रती मिळवून शिवाजी विद्यापीठातील शाहू संशोधन केंद्राचे संचालक डॉ. जयसिंगराव पवार त्यावर संशोधन व संपादकीय संस्कार करण्याचे काम गेली तीन वर्षे करत होते. या ग्रंथास त्यांनी ५६ पानांची प्रस्तावना लिहिली आहे. त्यामध्ये संपूर्ण ग्रंथाचे सार पाहावयास मिळते. डॉ. पवारांनी संपादित केलेला हा मेजर ग्रॅहॅमचा ग्रंथ इतिहासाचे एक अव्वल दर्जाचे प्राथमिक साधन आहे. कार्यक्रमादरम्यान हा ग्रंथ ३०० रुपयांमध्ये उपलब्ध होणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

14 AUG 2017 पुण्यनगरी

# ग्रंथातून उलगडणार २०० वर्षांपूर्वीचे कोल्हापूर

## शिवाजी विद्यापीठामध्ये आज प्रकाशन सोहळा

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

'स्टॅटिस्टीकल रिपोर्ट ऑन्र द प्रिन्सीपॅलिटी ऑफ कोल्हापूर' या ग्रंथाचे प्रकाशन शिवाजी विद्यापीठातील शाहू सिनेट सभागृहात सोमवार, दि. १४ रोजी सकाळी ११ वाजता होणार आहे. १८५४ मध्ये तत्कालीन पॉलिटिकल सुपरिटेंडंट मेजर डी. सी. ग्रॅहॅम यांनी सात वर्षांच्या अभ्यासाने या ग्रंथाचे लेखन केले. आता दोनशे वर्षांनी इतिहास तज्ज्ञ डॉ. जयसिंगराव पवार यांनी संपादित केलेल्या या ग्रंथाचे प्रकाशन अर्थ व कृषितज्ज्ञ डॉ. यशवंतराव थोरात यांच्या हस्ते, श्रीमंत शाहू छत्रपती महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे.

ईस्ट इंडिया कंपनीच्या आदेशावरून १८५४ मध्ये कोल्हापूरमधील तत्कालीन पॉलिटिकल सुपरिटेंडंट मेजर डी. सी. ग्रॅहॅम यांनी या ग्रंथाचे लेखन केले आहे. सातत्याने सात वर्षे श्रम घेऊन माहिती संकलित केलेला हा एक साधन ग्रंथ आहे. यामध्ये २०० वर्षांपूर्वीचे कोल्हापुरातील लोकजीवन, उद्योगधंदे, कृषिजीवन, कला, साहित्य यांची अतिशय बारकाईने माहिती ▶▶ पान २ वर

## ग्रंथातून उलगडणार २०० वर्षांपूर्वीचे कोल्हापूर

मांडण्यात आली आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील मराठी, कानडी आणि पार्शियन भाषेतील जवळजवळ २५ ते ३० शिलालेखांचा उल्लेख यामध्ये आहे. इंग्रज सरकार व कोल्हापूरकर छत्रपती यांच्यातील करार तसेच पत्रव्यवहार या ग्रंथात दिला आहे. २०० वर्षांपूर्वीचे कोल्हापूर कसे होते? राजर्षी शाहूपूर्व काळ कसा होता? याचे दर्शन घडवणारा हा एकमेव दस्तऐवज आहे. गेली १०० वर्षे हा ग्रंथ उपलब्ध नव्हता. ठिकठिकाणाहून त्याच्या प्रती मिळवून शिवाजी विद्यापीठातील शाहू संशोधन केंद्राचे संचालक डॉ. जयसिंगराव पवार त्यावर संशोधन व संपादकीय संस्कार करण्याचे काम तीन वर्षे करत होते. या ग्रंथास त्यांनी ५६ पानांची अत्यंत विवेचक व अभ्यासपूर्ण प्रस्तावना लिहिली आहे. या प्रस्तावनेत संपूर्ण ग्रंथाचे सार पाहावयास मिळते.

14 AUG 2017 लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'एनआयओ'समवेत सामंजस्य करार

## शिवाजी विद्यापीठातील विद्यार्थ्यांना समुद्रविज्ञानातील संशोधनाची संधी

लोकमत न्यूज नेटवर्क



समुद्रविज्ञान संशोधनाच्या अनुषंगाने केलेल्या सामंजस्य कराराच्या कागदपत्रांची शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे व 'एनआयओ'चे संचालक डॉ. सुनीलकुमार सिंग यांनी देवाणघेवाण केली. यावेळी शेजारी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, डी. व्ही. मुळे, पी. डी. राऊत, आदी उपस्थित होते.

**कोल्हापूर :** समुद्रविज्ञान संशोधनाच्या अनुषंगाने शिवाजी विद्यापीठाने गोवा येथील भारतीय समुद्रविज्ञान संस्थेसमवेत (एनआयओ) सामंजस्य करार केला आहे.

'एनआयओ'च्या कार्यालयात विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत गेल्या मंगळवारी (दि. ८) हा सामंजस्य करार करण्यात आला. या करारामुळे दोन्ही संस्थांमधील संशोधक विद्यार्थी व वैज्ञानिक यांना भविष्यात समुद्रविज्ञानाशी निगडित महत्त्वाच्या विषयांवर संशोधनकार्य करण्याची संधी उपलब्ध होणार असल्याचे कुलगुरु डॉ. शिंदे यांनी सांगितले.

यावेळी 'एनआयओ'चे संचालक डॉ. सुनीलकुमार सिंग आणि विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या केल्या. यावेळी विद्यापीठाचे अधिष्ठाता डॉ. पी. डी. राऊत, प्राणिशास्त्र अधिविभागाचे डॉ. डी. व्ही. मुळे, रसायनशास्त्र विभागाचे डॉ. पी. व्ही. अनभुले, 'एनआयओ'चे डॉ. रणधीर मुखोपाध्याय, बबन इंगोले,

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 AUG 2017
सकाळ

# शिवाजी विद्यापीठाचा समुद्र विज्ञान संस्थेशी करार

कोल्हापूर, ता. १३ : समुद्र विज्ञान संशोधनाच्या अनुषंगाने शिवाजी विद्यापीठाने गोव्याच्या भारतीय समुद्र विज्ञान संस्थेसमवेत (एनआयओ) सामंजस्य करार केला. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत एनआयओच्या कार्यालयात हा सामंजस्य करार करण्यात आला. करारामुळे दोन्ही संस्थांमधील संशोधक विद्यार्थी व वैज्ञानिक यांना भविष्यात समुद्री विज्ञानाशी निगडित महत्त्वाच्या विषयांवर संशोधनकार्य करण्याची संधी उपलब्ध होणार असल्याचे मत कुलगुरू डॉ. शिंदे यांनी व्यक्त केले. या वेळी एनआयओचे संचालक डॉ. सुनीलकुमार सिंग आणि कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी सामंजस्य करारावर स्वाक्षरी केल्या. या वेळी विद्यापीठाचे अधिष्ठाता डॉ. पी. डी. राऊत, प्राणीशास्त्र अधिविभागाचे डॉ. डी. व्ही. मुळे, रसायनशास्त्र विभागाचे डॉ. पी. व्ही. अनभुले तसेच राष्ट्रीय समुद्र विज्ञान संस्थेचे डॉ. रणधीर मुखोपाध्याय, डॉ. बबन इंगोले, डॉ. रमेश कुमार, डॉ. सोनिया सुकुमारन व डॉ. मंदार नात्रजकर उपस्थित होते.

14 AUG 2017 सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात डॉ. बापूजी साळुंखेंना अभिवादन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ परिसरातील डॉ. बापूजी साळुंखे यांच्या पुतळ्याचे त्यांच्या ३० व्या स्मृतिदिनानिमित्त प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्राचार्य डॉ. अभयकुमार साळुंखे यांच्या हस्ते पूजन झाले. या वेळी, प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर, प्राचार्य पी. एस. चव्हाण, डॉ. डी. ए. देसाई, डॉ. डी. सी. कांबळे, प्रा. बी. के. गोसावी आदी उपस्थित होते.

1 4 AUG 2017
जनसंपर्क कक्ष
सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# समाजाच्या प्रगतीत ग्रंथालयांचे योगदान मोठे : प्राचार्य बाहेती

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १३ : समाजाच्या प्रगतीमध्ये सार्वजनिक व शैक्षणिक ग्रंथालयांचे मोठे योगदान आहे, असे प्रतिपादन अकोला येथील गयादेवी जोशी महाविद्यालयाचे निवृत्त ग्रंथपाल व प्राचार्य डॉ. एस. आर. बाहेती यांनी केले. शिवाजी विद्यापीठातील बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालयातर्फे ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या १२५ व्या जयंतीनिमित झालेल्या एक दिवसीय कार्यशाळेमध्ये प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अधिष्ठाता डॉ. पी. डी. राऊत अध्यक्षस्थानी होते. राजर्षी छत्रपती शाहू सभागृहात कार्यशाळा झाली.

डॉ. बाहेती यांनी जुनी ग्रंथालये, ग्रंथालयशास्त्र व ग्रंथपाल हे बदलत्या काळानुसार कशी आधुनिक होत गेली, याचा आढावा घेतला. तसेच, शासन, ग्रंथालय शास्त्रातील संघटना यांचे योगदान स्पष्ट केले. द्वितीय सत्रात एडविन थॉमस इबस्को यांनी ई-रिसोर्सवर प्रात्यक्षिकासह माहिती दिली. डॉ. नमिता खोत यांनी यूजीसीने ग्रंथपाल प्रवर्गासाठी नव्याने सुचविलेल्या एपीआयबाबत माहिती दिली. चर्चासत्रात पॅनलिस्ट म्हणून प्रशांत कल्लोळी, डॉ. डी. बी. सुतार, डॉ. पी. बी. बिलावर व डॉ. एस. व्ही. थोरात यांनी सहभाग नोंदविला. या वेळी पीएच.डी. पदवी संपादन केलेल्या ग्रंथपालांचा सत्कार झाला. डॉ. सुतार यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 AUG 2017
महाराष्ट्र टाईम्स

# पर्यावरणशास्त्र विभागातर्फे ट्री गणेश कार्यशाळा

**म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर**

शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र विभागाच्यावतीने ट्री गणेश कार्यशाळा झाली. सालाबादप्रमाणे यावर्षीदेखील गणेश उत्सवाचे वातावरण सुरु झाले आहे. प्लास्टरच्या गणेश मूर्तीनी होणारे पर्यावरणाचे प्रदूषण थांबवण्यासाठी अनेक वेगवेगळे पर्याय अनेक संस्था, संघटना, मंडळे यांच्याकडून शोधले जातात आणि त्याचा प्रचार- प्रसार केला जातो. याच जाणीवेतून हि कार्यशाळा आज येथे आयोजित करण्यात आली होती.

कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी विज्ञान परिषदेचे अध्यक्ष शिवाजीराव पवार प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.यावेळी गौरव काइंगडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. शाडूची गणेश मूर्ती बनवून, ती वाळल्यानंतर त्यामध्ये फुलाच्या बिया खोवून या मूर्तीची निर्मिती करण्यात येते. या गणेशमूर्तीचे घरीच एखाद्या कुंडीमध्ये विसर्जन करून त्यावर पाणी घातल्यानंतर या मूर्तीची परत माती बनते, आणि यामध्ये खोवलेल्या बिया रुजून येतात आणि त्यामधून रोपे आणि फुले आपल्याला नंतर काही दिवस आनंद देत राहतात अशी यामागाची संकल्पना आहे.

निसर्गातून निर्माण केलेली गणेश मूर्ती परत निसर्गात कोणत्याही हानीविना विसर्जित करणे आणि ती परत करताना त्यातून अधिक काही निसर्गाला देणे हे या कृतीतून साध्य होते. यावेळी कार्याशाळेमध्ये पर्यावरणशास्त्र विभाचे ९० विद्यार्थी आणि बाहेरील शाळांमधील २५ विद्यार्थी अश्या एकूण ११५ लोकांनी सहभाग घेतला. दुपारी २ ते ५ यावेळात झालेल्या ह्या कार्यशाळेश अत्यंत चांगला प्रतिसाद लाभला. विभागप्रमुख प्रा. डॉ. पी. डी. राऊत यांनी प्रास्ताविक केले. डॉ. पल्लवी भोसले यांनी आभार प्रदर्शन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 AUG 2017

सकाळ

# प्रा. विक्रम यमगेकर यांना कलर अॅवॉर्ड



कळे, ता. १३ : येथील प्रा. विक्रम सयाजी यमगेकर यांना शिवाजी विद्यापीठातर्फे कलर अॅवॉर्ड देऊन गौरविण्यात आले. आंतरविद्यापीठ स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाचे संघ व्यवस्थापक म्हणून उत्कृष्ट कामगिरी बजावल्याबद्दल आंतरराष्ट्रीय नेमबाज राधिका बराले यांच्या हस्ते त्यांचा सत्कार झाला. या वेळी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, क्रीडा अधिविभागप्रमुख डॉ. पी. टी. गायकवाड यांच्यासह विद्यापीठाचे सर्व शिक्षक, प्राध्यापक, कर्मचारी उपस्थित होते. श्री. यमगेकर कळे येथील वि. पा. महाविद्यालयाचे क्रीडा शिक्षण संचालक म्हणून कार्यरत आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 AUG 2017
लोकमत

◆ **आद्य ग्रंथाचे प्रकाशन** : शिवाजी



विद्यापीठ यांच्यातर्फे शाहू संशोधन केंद्राचे संचालक डॉ. जयसिंगराव पवार संपादित 'स्टॅटिस्टिकल रिपोर्ट ऑन द प्रिन्सिपलॅटी ऑफ कोल्हापूर' (१८५४ ए. डी.) या कोल्हापूरच्या इतिहासाच्या आद्य ग्रंथाचे प्रकाशन. प्रमुख उपस्थिती : शाहू छत्रपती. हस्ते : डॉ. यशवंतराव थोरात, अर्थ व कृषितज्ज्ञ. कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर. वेळ : सकाळी ११ वा. स्थळ : शाहू सिनेट सभागृह, शिवाजी विद्यापीठ.